अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील सहसंचालक, गट-“अ” (राजपत्रित) या संवर्गातील पदावर नामनिर्देशनाद्वारे देण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन आदेश क्रमांकः नामनि-१२१८/प्र.क्र.१०५/का.१४२७

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०२ ऑगस्ट, २०१९

वाचा - १) महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.८७८(१)(१११)/२३४२/ आठ, दिनांक २०/१२/२०१८.

२) नियोजन विभागाचा समक्रमांकाचा शासन आदेश दिनांक ३१/०५/२०१९.

शासन आदेश

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्यांच्या संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय सामान्य राज्य सेवा, गट- “अ” (राजपत्रित), या पदावरील नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी ०२ उमेदवारांची गुणवत्ता क्रमांकानुसार शिफारस केली आहे. संदर्भाधिन शासन आदेश क्र. २ अन्वये, सदर उमेदवारांना सहसंचालक, गट-“अ” (राजपत्रित) या संवर्गातील पदावर पदस्थापना देण्यात आली आहे. संदर्भाधिन क्रमांक २ च्या आदेशातील परिच्छेद क्र. ३ मध्ये “आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत रुजू होण्याबाबत व सदर कालमर्यादेत रुजू न झाल्यास संबंधित उमेदवारांस नियुक्ती स्विकारावयाची नाही; हे गृहित धरुन त्यांचे नियुक्ती आदेश रद्द करण्यात येतील”, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार खाली नमूद केलेले उमेदवार श्री.संजय वसंत काळे त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविलेल्या कारणास्तव रुजू न झाल्यामुळे त्यांची दिनांक ३१/०५/२०१९ च्या आदेशान्वये सहसंचालक (आर्थिक सेवा), मृद व जलसंधारण आयुक्तालय, औरंगाबाद या पदावर केलेली नियुक्ती/ पदस्थापना या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे.

अ. क्र.	उमेदवारांचे नांव व जातीचा प्रवर्ग	नियुक्तीचा प्रवर्ग	गुणवत्ता क्रमांक	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	श्री.संजय वसंत काळे (भज-क)	भज-क	२	विहित कालमर्यादेत रुजू झालेले नाहीत.

२. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर शासन आदेश उपलब्ध करण्यात आला असून; त्याचा संकेताक २०१९०८०२१६१३२१००१६ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tushar
Purushottam
Hirlekar

Digitally signed by Tushar Purushottam Hirlekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6dd848a31422ed36ba4503d4744b6dc20833c851babace12b16b7bba3f67cca2, cn=Tushar Purushottam Hirlekar
Date: 2019.08.03 12:14:26 +05'30'

(तु.पु.हिर्लेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री. संजय वसंत काळे,
जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
२. मा. मंत्री (नियोजन)/ मा.राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई, (पत्राने).
४. आयुक्त, मृद व जलसंधारण आयुक्तालय, औरंगाबाद
५. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर
६. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
७. उप सचिव/ अवर सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. उपसंचालक (प्रशासन), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, औरंगाबाद
११. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१२. निवड नस्ती.